






# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ०५० ● पुणे ● शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

खडकवासला मतदारसंघात मतदार यादीत मोठा घोळ! 3



लोणी काळभोर पोलिस ठाण्यातर्फे एकता दौड स्पर्धेचे आयोजन 4

# ताई तुम्ही चुकताय असं वाटतं नाही का?

## महिला डॉक्टरांच्या चारित्र्यावरून वाद; महिला आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सातारा जिल्ह्यात महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात तपास पूर्ण होण्याआधीच पीडित डॉक्टरांच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित केल्याचा आरोप राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकरांवर होत आहे. यामुळे पीडितेच्या कुटुंबीयांसह सामाजिक कार्यकर्त्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

चाकणकरांनी पत्रकार परिषद घेऊन पीडित डॉक्टरच्या वैयक्तिक नातेसंबंधांवर भाष्य केले. यामुळे तपासावर परिणाम होऊ शकतो असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. "पोलीस तपास सुरू असताना आयोगाकडून निष्कर्ष जाहीर करणे चुकीचे आहे," अशी टीका केली जात आहे.

मृत डॉक्टरच्या बहिणीने सांगितले की, "आम्हाला आजवर CDR किंवा तपासाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे मिळाली नाहीत. मग रूपाली चाकणकरांनी कोणत्या आधारावर निष्कर्ष काढला?"

भावाच्या म्हणण्यानुसार, "तपास सुरू आहे, पीएम रिपोर्टही आम्हाला मिळाला नाही, तरी चाकणकर आत्महत्या असल्याचं ठाम सांगत आहेत.

पीडितेच्या बाजूने उभं राहणं अपेक्षित असताना आरोपींची बाजू घेतल्यासारखं का बोलल्या?"

कुटुंबीयांनी आयोगाने त्यांना भेटून सांत्वन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती; परंतु तसे झाले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

सामाजिक कार्यकर्त्या वर्षा देशपांडे म्हणाल्या, "तपास पूर्ण झालेला नसताना पत्रकार परिषदेतील विधानं गैरजबाबदार आहेत. महिला आयोग हे महिलांसाठी आहे की आरोपींच्या बाजूने बोलण्यासाठी?"

सामाजिक कार्यकर्त्या सुशी मोराळे म्हणाल्या, "महिला आयोगाकडे तपासाचा अधिकार नाही. तरी पत्रकार परिषद घेऊन तपासाच्या निष्कर्षासारखे विधान कसे करता येते?" याप्रकरणी अनेकांनी चाकणकरांच्या भूमिकेला पक्षीय कल असल्याची टीका केली. या आधीही काही प्रकरणांत त्यांनी अशाच पद्धतीने वादग्रस्त भूमिका घेतली असल्याचे आरोप कार्यक्रमात करण्यात आले.

**राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या रूपाली पाटील म्हणाल्या,** "महिला आयोगाने व्यक्त केलेले मत हे राष्ट्रवादी पक्षाचे अधिकृत मत नाही. तपास प्रलंबित असताना आयोग प्रमुख का बोलले, हा प्रश्न आहे." त्यांनी आयोगाची कार्यपद्धती आणि पत्रकार परिषदेतील मांडणीवर शंका उपस्थित केली.



सामाजिक दबाव आणि राजकीय छाया (संपादकीय)

**स्पेशल रिपोर्ट - मा. श्री. प्रतिक गंगणे**

### मुख्य मुद्दे

- तपास अपूर्ण असताना निष्कर्ष
- मृत डॉक्टरची CDR माहिती सार्वजनिक?
- आयोगाने कुटुंबीयांशी संवाद साधला नाही
- पत्रकार परिषदेत एसपी उपस्थित, पण मौन



# आज विरोधक एकत्र

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मतदारयाद्यांमधील घोळ आणि कथित मतचोरीविरोधात महाविकास आघाडी आज एल्गार पुकारणार आहेत. महाविकास आघाडी आणि मनसे आज मुंबईत आयोगाविरोधात मोर्चा काढणार आहे. सत्याचा मोर्चा असं या मोर्चाचं नामकरण करण्यात आलंय. या मोर्चाला उद्धव ठाकरे , राज ठाकरे, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे उपस्थित असणार आहेत. आयोगाचा बेजबाबदार कारभार, मतचोरी, मतांमधील घोळ, निवडणुकीतील गैरव्यवहार याबाबत हा मोर्चा काढण्यात येत आहे. लोकांना सत्य कळावं आणि असत्य जनतेसमोर यावं या मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांसह जात राज ठाकरेंनी केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोगाला पत्र दिलं होतं. मात्र निवदेनं देऊन काही उपयोग नसल्याने हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचं मविआ आणि मनसेने सांगितलं आहे.

चार प्रमुख मागण्या राज ठाकरेंच्या मनसेने आणि महाविकास आघाडीने केल्या आहेत. सत्याचा मोर्चा याच मागण्यांसाठी काढला जाणार आहे. राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमध्ये घोळ घातल्याचा आरोप केला होता. निवडणूक आयोग आणि भाजपा यांचं साटंलोटं असल्याचंही म्हटलं होतं.

**मोर्चाचा मार्ग नेमका कसा असेल?**

**दुपारी १२ ते १२.३० च्या दरम्यान मुंबईतील फॅशन स्ट्रीट या भागातून मोर्चा सुरु होईल. फॅशन स्ट्रीटकडून मोर्चा मेट्रो सिनेमाच्या चौकात आणि त्यानंतर मुंबई महापालिकेच्या मुख्यालयाच्या दिशेने जाईल मुंबई महापालिकेच्या मुख्यालयाजवळ स्टेज उभारण्यात आलं आहे. त्या ठिकाणी मविआच्या नेत्यांची भाषणं होतील. राज ठाकरेंचंही भाषण होईल.**

### विरोधकांच्या मागण्या काय आहेत?

१) महापालिका निवडणुकांच्या आधी मतदार याद्या अद्ययावत करा, त्यात कुठलीही चूक नको

२) मतदार याद्या अद्ययावत होईपर्यंत निवडणुका घेऊ नका, त्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागला तरीही चालेल.

३) मतदार याद्यांमधली दुबार नावं काढा

४) ७ नोव्हेंबरपर्यंत मतदार नोंदणी करा

## ठळक बातम्या


### नव्या चेहऱ्यांची एन्ट्री पण, पदांची प्रतीक्षा

**पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत (मनसे) अलीकडे अनेकांनी पक्ष प्रवेश केला असून, नव्या कार्यकर्त्यांमध्ये संघटनात्मक पदांची उत्सुकता वाढली आहे. स्थानिक पातळीवर युवक व व्यावसायिकांनी मनसेत प्रवेश केल्यानंतर शहर व जिल्हा संघटनांमध्ये नव्याने उर्जेचा संचार झाल्याचे दिसत आहे. पक्षप्रवेशानंतर मनसेच्या पुण्यातील राजकीय समीकरणात काहीसा बदल दिसून येत आहे. पक्ष संघटना विस्ताराच्या दृष्टीने माजी पदाधिकारी, समाजातील विविध क्षेत्रातील व्यक्ती, व्यावसायिक, तरुण वर्ग मोठ्या संख्येने मनसेत दाखल झाले आहेत. मात्र, या नव्या कार्यकर्त्यांना संघटनेत जबाबदाऱ्या मिळाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या धोरणांवर विश्वास ठेवून अनेकांनी पक्षात प्रवेश केला. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व भविष्यातील राजकीय समीकरण लक्षात घेता नव्या पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या मिळण्याचे संकेत मिळत आहेत.**

# दाभोळकरांचे विचारधन आता इंग्रजीत; दहा पुस्तिकांचा अनुवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


अंधश्रद्धा निर्मूलन आणि विवेकनिष्ठ समाजनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवून त्यासाठी प्राणाचे बलिदान देणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे विचारधन आता इंग्रजीमध्ये उपलब्ध झाले आहे. विविध विषयांवरील दाभोलकर यांच्या दहा पुस्तिकांचा इंग्रजीच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा. राही डहाके यांनी अनुवाद केला असून, दाभोळकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून शनिवारपासून (१ नोव्हेंबर) पूर्वनोंदणी केलेल्या वाचकांना या पुस्तिकांचे वितरण होणार आहे.



'खूप दिवसांपासून डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या छोट्या मराठीतील पुस्तिका इंग्रजीमध्ये मिळतील का, अशी विचारणा होत होती. त्यावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रकाशन विभागाचे गेल्या चार महिन्यांपासून काम सुरू होते. मुंबई येथील विल्सन कॉलेजमधील इंग्रजीच्या प्राधापक राही डहाके यांनी डॉक्टरांच्या या दहा पुस्तिका इंग्रजीमध्ये अनुवादित केल्या आहेत. 'अंगात येणे', 'सुशिक्षितांच्या अंधश्रद्धा', 'एक न संपणारा प्रवास', 'भुताने झपाटणे', 'आध्यात्मिक बुवाबाजी' अशा विविध विषयांवर दाभोलकर यांनी लेखन केलेल्या पुस्तिकांचा अनुवाद राही डहाके यांनी केला आहे. राही डहाके या ज्येष्ठ साहित्यिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांची कन्या आहेत. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर दोनशे रुपयांमध्ये या पुस्तिका घरपोच मिळतील. समितीचे दीपक गिरमे आणि प्रकाशन विभागाचे राहुल थोरात यांनी या कामामध्ये मोलाचे योगदान दिले आहे,' अशी माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते डॉ. हमीद दाभोळकर यांनी दिली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या या दहा पुस्तिका इंग्रजीमध्ये आल्यामुळे त्या देशभर आणि जगभर पोचतील, अशी आशा आहे.

# नगरपरिषद, नगरपंचायतींच्या अंतिम मतदार याद्या जाहीर

- **तब्बल ६० हजार हरकतींचा निपटारा**
- **फुरसुंगी-उरुळी देवाचीमध्ये सर्वाधिक १८ हजार हरकती; ७ नोव्हेंबरला मतदान केंद्रांची यादी होणार जाहीर**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतींच्या अंतिम मतदार याद्या शुक्रवारी जाहीर करण्यात आल्या. सुमारे ६० हजार हरकती आणि सूचना प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. प्रत्येक नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या वतीने पथके तयार करून स्थळपाहणी करण्यात आली. पाहणीनंतर संबंधित शंकांचे निरसन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा प्रशासनातील नगरविकास विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी दिली.

जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार याद्यांवर तब्बल ५९ हजार ९७८ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये मुख्यत्वे प्रभागबदलाशी संबंधित हरकती आहेत. या हरकतींबाबत प्रत्यक्ष मतदारांच्या घराला भेट देऊन निर्णय घेण्यात आला आहे. एकूण हरकतींपैकी १८ हजार २३४ हरकती फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषदेच्या हद्दीतील आहेत.

# पुस्तक खरेदी प्रस्ताव नामंजूर

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना ठरवीक प्रकाशकांची साडेचार कोटी रुपयांची पुस्तके विनानिविदा खरेदी करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत दफ्तरी दाखल करण्यात आला.


पुणे महापालिकेच्या शाळेत इयत्ता दुसरी ते पाचवीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, गणित, इंग्रजी, बुध्दिमत्ता, संगणक या विषयांच्या लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके खरेदीचा निर्णय महापालिका प्रशासकाकडून घेण्यात आला होता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष निम्मे संपले असतानाही महापालिका प्रशासनाने साडेचार कोटींच्या पुस्तकांची विनानिविदा खरेदी करण्याचा घाट घातल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते. महापालिका प्रशासनाने स्थायी समितीच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवलेल्या या प्रस्तावावर सर्वच स्तरांतून टीका झाली.



महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके आवश्यक असल्याचे अचानक ठरविण्यात आले. त्यासाठी काही मुख्याध्यापकांच्या समितीने पुस्तके कशी असावी, हे ठरवले त्यासाठी काही प्रकाशकांची पुस्तके निवडण्यात आली होती. त्यापैकी एका प्रकाशनाची पुस्तकांची खरेदी विनानिविदा घेण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला होता.

यावर महापालिकेत उलटसुलट चर्चा सुरू झाल्यानंतर स्थायी समितीच्या बैठकीत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा प्रस्ताव नामंजूर करून दफ्तरी दाखल करण्याचे आदेश दिले. आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयामुळे महापालिकेतील शिक्षण मंडळातील जे अधिकारी तसेच भांडार विभागातील अधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव मान्य करावा, यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्याला खो बसला आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, शैक्षणिक वर्ष निम्मे संपले असतानाही साडेचार कोटी रुपयांची पुस्तके खरेदीचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. हा प्रस्ताव ठेवल्याने प्रशासनाच्या कामाचे आश्चर्य वाटले. या पुस्तकांचा लाभ विद्यार्थ्यांना होणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने हा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.

महापालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखन सरावासाठी व्यवसाय पुस्तके हवी असल्याचे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. यासाठी पुस्तके नक्की कशी असावी, यासाठी काही मुख्याध्यापकांवर जबाबदारी देण्यात आली. ठराविक प्रकाशकांची पुस्तके यासाठी निवडण्यात आली होती.



# सामाजिक दबाव आणि राजकीय छाया

**सातारा जिल्ह्यातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणाने राज्यभरात दुःखाची लाट पसरली आहे. तरीही या संवेदनशील प्रकरणात तपास पूर्ण होण्याआधीच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन पीडित व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यावर भाष्य केले. ही भूमिका केवळ अविचारी नाही, तर महिला आयोगासारख्या संस्थेच्या अपेक्षित कार्यपरिघालाच प्रश्नांकित करते.**

पोलीस तपास सुरू असताना आयोगाने निष्कर्ष मांडणे हे तपास प्रक्रियेला प्रभावित करणारे ठरू शकते. कारण अजून CDR, पोस्टमॉर्टम रिपोर्ट किंवा पुराव्यांची माहिती कुटुंबीयांनाही मिळालेली नाही; मग आयोगाने मिळवलेली माहिती नेमकी काय आणि कशी? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.

महिला आयोगाची प्राथमिक जबाबदारी पीडितांच्या बाजूने उभे राहणे, त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देणे आणि तपासाला सहकार्य करणे ही आहे. परंतु येथे पीडितेचे चारित्र्य जाहीरपणे चर्चेचा विषय बनवणे, अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत वादग्रस्त विधान करणे-यातून पीडितेच्या सन्मानाचे उल्लंघन झाल्याची भावना बळावते.

कुटुंबीयांची वेदना - 'चारित्र्यहनन अमान्य'

कुटुंबीयांची पीडा अतिशय स्वाभाविक आहे. दुःखाच्या काळात त्यांना न्याय मिळण्याऐवजी, 'चारित्र्य' हा मुद्दा पुढे येतो; ही प्रवृत्ती समाजाच्या कालबाह्य मानसिकतेकडे निर्देश करते. म्हणूनच त्यांच्या संतापाला अधिक वजन आहे.

"तपास चालू असताना निष्कर्ष कसे?" हा त्यांचा प्रश्न थेट प्रशासनालाच नव्हे तर लोकशाही व्यवस्थेलाही विचारतो.

या प्रकरणात राजकीय गल्लीतूनही प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. महिला आयोग ही स्वतंत्र व लोकहिताची यंत्रणा आहे;



परंतु तिच्या प्रमुखांची भूमिका पक्षीय झुकाव दाखवणारी असल्याची टीका गंभीर आहे.

आयोगाच्या बैठकीत SP उपस्थित असूनही ते मौन बाळगणे-ही देखील संशय वाढवणारी बाब आहे.

एखाद्या महिलेच्या मृत्यूच्या तपासात तिच्या वैयक्तिक नात्यांचे प्रसारण आणि चारित्र्याचा उहापोह करण्याचा अधिकार कोणालाच नाही. निर्भया, भवरी देवी, मथुरा प्रकरणांसारख्या उदाहरणांनी हे स्पष्ट झाले आहे की सामाजिक व मानसिक हिंसा ही शारीरिक अत्याचाराइतकीच गंभीर असते.

पीडितेला गुन्हाची आरोपी ठरवणारी भाषा ही पुरुषसत्ताक प्रवृत्तीतूनच उद्भवते.

महिला आयोगाने या प्रवृत्तींना आळा घालणे अपेक्षित असताना, उलट महिलांचे चारित्र्य प्रश्नांकित करणे ही विचलित करणारी स्थिती आहे.

या प्रकरणातील तपास SIT कडे सोपवण्यात आला आहे.

तपासाचा अहवाल येईपर्यंत कोणताही निष्कर्ष किंवा आरोप निश्चित स्वरूपात मांडणे अयोग्य ठरेल.

कुटुंबीयांना पुरावे उपलब्ध करून देणे, त्यांच्या मागण्यांची दखल घेणे-ही राज्य यंत्रणेची जबाबदारी आहे.

***योग्य मार्ग - सावध भाष्य, संवेदनशील भूमिका***
***महिला आयोगाची प्राथमिक भूमिका***
***पीडितेच्या बाजूने ठाम उभे राहण्याची***
***तपासावर परिणाम होईल अशी***
***सार्वजनिक विधाने न करण्याची***
***कुटुंबीयांशी संवाद साधण्याची***
***समाजात विश्वसनीयता टिकवण्यासाठी***
***पारदर्शकता राखण्याची***
***याची जाणीव अधिक तीव्र असायला हवी.***

**शेवटी :** या प्रकरणात सर्वात महत्त्वाचे म्हणजे - पीडितेला न्याय मिळाला पाहिजे. तपास निष्पक्ष, निर्भेळ आणि राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त असावा. तपास पूर्ण होण्याआधीच पीडितेच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह लावणाऱ्या वाक्यांनी केवळ कुटुंबीयांना नव्हे, तर संपूर्ण समाजाला धक्का बसतो. समाज म्हणून आपण पीडितेला न्याय मिळवून देण्याच्या दिशेने उभे राहणे-हीच आपल्या संवेदनशीलतेची खरी परीक्षा आहे.

## स्वच्छता कर्मचारी भगिनींसोबत हरिभाऊ चरवड यांनी साजरी केली भाऊबीज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गेल्या २५ वर्षांची परंपरा जपत माजी नगरसेवक हरिदास चरवड यांनी यंदाही वडगाव बुद्रुक, धायरी, नऱ्हे आणि वडगाव खुर्द परिसरातील स्वच्छता कर्मचारी महिला भगिनींसोबत भाऊबीज उत्साहात साजरी केली.

रोज पहाटेपासून शहर स्वच्छ ठेवणाऱ्या या स्वच्छतेच्या खऱ्या योद्ध्या भगिनींना माजी नगरसेवक हरिदास चरवड यांनी भाऊबीज निमित्त शुभेच्छा आणि सन्मान अर्पण केला. त्यांच्या कष्टांमुळेच आपलं पुणे शहर स्वच्छ आणि सुंदर राहातं, असा भावनिक संदेश त्यांनी दिला.



या प्रसंगी माजी नगरसेविका ज्योतीताई गोसावी, आरोग्य विभागाचे वरिष्ठ आरोग्य निरीक्षक मंगलदास माने, आरोग्य निरीक्षक संदीप खरोड, कुणाल मते, मुकादम अशोक साठे, महेश लोंढे, दीपक नांदळे, तसेच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मनेरे, शहाजी वांजळे, संदीप चरवड, सुनील चरवड, अनंता बनकर, गणेश कुटे, संदीप कुटे, विशाल कुटे, आकाश लोणारे, शिवानंद पाटील, केदारनाना जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

> **"या भगिनी आमच्या समाजाची खरी शक्ती आहेत. त्यांच्यामुळेच आपलं शहर स्वच्छ आणि निरोगी राहातं. आजचा दिवस त्यांच्या सेवेला सलाम करण्याचा आहे."**
> **- हरिदास चरवड, माजी नगरसेवक**

कार्यक्रमात सर्व भगिनींना आदरपूर्वक शुभेच्छा व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणि चेहऱ्यावर समाधान झळकत होतं. भाऊबीजाचा हा सोहळा केवळ सण नव्हे, तर आदर, प्रेम आणि कृतज्ञतेचा भावनिक क्षण ठरला. या उपक्रमाने "स्वच्छतेचा सण, मायेचा सन्मान" असा सुंदर संदेश समाजात दिला.

## भूपेंद्र मोरे यांना पुरस्कार प्रदान



**नऱ्हे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या जनआंदोलनाची दखल घेत लोकमत समूहा तर्फे त्यांना "लोकमत एक्सलन्स ऑफ द इयर – द टर्निंग पॉईंट अवॉर्ड" या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले.

हा पुरस्कार आयुक्त नवल राम किशोर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी लोकमतचे संपादक श्री. संजय आवटे तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. भूपेंद्र मोरे यांनी सांगितले की, "हा सन्मान माझा नाही, तर नऱ्हेकर जनतेच्या संघर्षाचा आणि विश्वासाचा आहे. जनतेच्या आवाजाला शासनापर्यंत पोहोचवताना आपण सर्वांनी मिळून उभारलेला बदल आज मान्यतेच्या टप्प्यावर पोहोचला आहे. पुढेही जनतेच्या हितासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन."

मोरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चक्काजाम आंदोलनाने नऱ्हे परिसरातील नागरिकांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या या कार्यामुळे परिसरातील विविध कामे व प्रश्न मार्गी लागले. त्यामुळे नागरिकांनी त्यांच्या कामाबद्दल कौतुक व्यक्त केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### पुणे शहर भाजप सरचिटणीसपदी रोहिणी राहाणे यांची निवड



**पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी पुणे शहराच्या सरचिटणीस पदावर रोहिणी राहाणे यांची निवड करण्यात आली आहे. शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी ही नियुक्ती जाहीर केली. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या संघटनात्मक फेरबदलाला वेग आला असून, राहाणे यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते त्यांना निवड पत्र देण्यात आले. यावेळी शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे उपस्थित होते. रोहिणी राहाणे या यापूर्वी पुणे दक्षिण जिल्हा उपाध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. त्या "जानकी प्रतिष्ठान" या सामाजिक संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा असून, समाजकारण आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत.राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत, महिलांच्या हक्कांसाठी आवाज उठवणे, गरजूंसाठी मदतकार्य करणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत सक्रिय सहभाग हे त्यांच्या कार्याचं वैशिष्ट्य राहिलं आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सांगितले की, "रोहिणी राहाणे यांचा संघटनावर चांगला ताबा आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे पक्षाला नवी ऊर्जा मिळेल." या निवडीनंतर भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, राहाणे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष आणखी बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.**



### "पदवीधर मतदारांसाठी एकदाच कायम नोंदणी प्रणाली लागू करा"

**पुणे (आरंभ पर्व) : पदवीधर मतदारसंघातील विद्यमान मतदार नोंदणी प्रक्रियेतील त्रुटी, पुनर्नोंदणीच्या सक्तीमुळे निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती आणि निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या सुधारणा मागण्यांविषयी अधिक माहिती देण्यासाठी महाराष्ट्र युवा महासंघाचे अध्यक्ष व समता परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सुदर्शन घेरडे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या वेळी त्यांनी "पदवीधर मतदारांसाठी एकदाच कायमस्वरूपी नोंदणी प्रणाली लागू करण्याची" मागणी केली असून, या संदर्भात बॉम्बे हायकोर्टात सार्वजनिक हित याचिका (PIL) दाखल केल्याची माहिती दिली. डॉ. घेरडे यांनी सांगितले की, "पदवीधर मतदार नोंदणी प्रक्रियेत असलेल्या त्रुटींमुळे सुशिक्षित नागरिकांचा मोठा वर्ग मतदानापासून वंचित राहत आहे, ज्यामुळे लोकशाहीतील समान मतदान हक्काचे (कलम ३२६) उल्लंघन होत आहे. त्यामुळे ही प्रक्रिया तातडीने सुधारण्याची गरज आहे." पुणे पदवीधर मतदारसंघात (पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) २०१९ मध्ये ५.९१ लाख मतदार नोंदणीकृत होते. दरवर्षी सरासरी १० टक्के वाढ गृहीत धरली तरी २०२५ मध्ये ही संख्या ६.५ लाखांपर्यंत जावी, मात्र प्रत्यक्ष पात्र पदवीधरांची संख्या १२ ते १५ लाखांच्या दरम्यान आहे.**



## पुणे जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षपदी श्रीरंग (नाना) चव्हाण पाटील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी माननीय श्री. श्रीरंग (नाना) चव्हाण पाटील यांची निवड होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या निवडीनिमित्त काँग्रेस भवन, पुणे येथे गुरुवारी (30 ऑक्टोबर 2025) आयोजित पदग्रहण समारंभात मोठ्या संख्येने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजेरी लावली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला चव्हाण पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. जिल्हा काँग्रेस संघटनेला नवे बळ आणि नवी दिशा मिळण्याच्या आशेने अनेक पदाधिकारी, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस व समर्थक वर्ग उपस्थित होते.

आपल्या मनोगतात चव्हाण पाटील म्हणाले, "पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची गौरवशाली परंपरा आहे. जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करणे आणि संघटना अधिक मजबूत करणे हे माझे प्राधान्य असेल. सर्वांनी एकजुटीने काम करून पक्षाला मजबुती द्यावी," असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे विभागप्रमुख, पदाधिकारी तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. संपूर्ण परिसरात ऐक्य, उत्साह आणि नवचैतन्याची भावना पाहायला मिळाली.

## नांदोशीत भर पावसात जन आक्रोश आंदोलन

- **मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची मागणी**
- **नागरिकांकडून महापालिका प्रशासनाचा निषेध**



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या सिंहगड रस्ता परिसरातील नांदोशी, सणसनगर येथे रस्ते, दुषित पाणी, आरोग्य आदी मूलभूत सुविधांअभावी हालाखीत जगणाऱ्या संतप्त नागरिकांनी शुक्रवारी भरपावसात रस्त्यावर बसून जन आक्रोश आंदोलन केले. या वेळी महापालिका प्रशासनाचा निषेध करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांपासून किरकटवाडी ते नांदोशी, सणसनगर रस्त्याची खड्डे पडून दुरवस्था झाली आहे. या रस्त्यावर झालेल्या अपघातांत निष्पाप नागरिकांचे बळी गेले आहेत. दुषित पाण्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले असून, याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. महापालिका प्रशासनाला याबाबत वारंवार निवेदने देऊनही दखल घेतली जात नाही. गावातील रस्त्यांची दुरवस्था आणि चिखलामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महापालिकेने या गावासाठी १ कोटी २० लाख रुपयांची विकासकामे कागदावर दाखवून बिलेही काढल्याचा आरोप या वेळी करण्यात आला. मागण्यांची दखल न घेतल्यास आगामी महापालिका निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशाराही या वेळी आंदोलकांनी दिला.

रहिवासी गणेश हेमगुडे म्हणाले, 'खडकवासला धरणाजवळ असूनही प्यायला पाणी नाही, स्मशानभूमीची दुरावस्था आहे. **किरकटवाडीचे माजी सरपंच गोकूळ करंजावणे म्हणाले,** 'महापालिकेतील समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा विकास केवळ कागदावर आहे. नागरिकांना मूलभूत गोष्टींसाठी संघर्ष करावा लागत आहे.' सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार-पवार यांनी आंदोलन स्थळी भेट घेऊन नागरिकांशी चर्चा केली. मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पोकळे, खडकवासलाचे माजी सरपंच सौरभ मते, राहुल मते, राहुल घुले, अक्षय किवळे, किरण घुले, मीना घुले, काजल हेमगुडे जयश्री मातळे, सुनिता घुले आदींसह नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र इलेक्शन : राज ठाकरे यांना हलक्यात घेणे भाजप–शिंदे युतीला महागात?

**मा. श्री. प्रतिक गंगणे**

## मनसे–महाविकास आघाडी समीकरणामुळे राजकीय गणित बदलण्याची शक्यता

**सिंहगड रोड (दै. आरंभ पर्व)**

मुंबई महानगरपालिका निवडणुका तसेच आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे नव्याने बदलताना दिसत आहेत. विशेषतः महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाविकास आघाडीशी हातमिळवणी केल्यानंतर भाजप–एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील युतीसमोर नवीन आव्हाने उभी राहिली आहेत.

गेल्या काही काळात राज ठाकरे यांनी भाजप आणि शिंदे गटावर मोठ्या प्रमाणात हल्ला चढवत आपली उपस्थिती जाणवून दिली आहे. त्यामुळे, "राज ठाकरे यांना हलक्यात घेणे महागात पडू शकते," असा अंदाज राजकीय निरीक्षकांकडून व्यक्त केला जात आहे.

**महाविकास आघाडीचा पाठिंबा - समीकरणातला सर्वात मोठा बदल**

यापूर्वी मनसेने बहुतांश निवडणुका स्वतंत्रपणे लढवल्या. यामुळे मनसेचा मतदारवर्ग तुटक राहिला आणि पर्याप्त संघटनात्मक बळ नसल्याने बहुसंख्य ठिकाणी ते निर्णायक ठरू शकले नाहीत.

परंतु यावेळी मनसे महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून लढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

त्यामुळे मनसेची जी ठराविक 'वोट बँक' आहे ती अधिकृतपणे महाविकास आघाडीला हस्तांतरित होऊ शकते.

काही मतदारसंघांत मनसेची स्वतंत्र ताकद असून, स्थानिक नेत्यांचा प्रभाव लक्षात घेतला तर तिथे मनसे-समर्थक मतांचे आघाडीच्या बाजूला ध्रुवीकरण होऊ शकते. यामुळे अनेक जागांवर भाजप–शिंदे गट अडचणीत येऊ शकतो.

**'ठाकरे ब्रँड'चा भावनिक व राजकीय प्रभाव कायम :** भाजपकडून वारंवार "ठाकरे संपले" असा प्रचार केला जात असला तरी मुंबई–परिसरात ठाकरे नावाची जादू आजही कायम आहे.





शेवटच्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाला राज्यभर 20 जागा जिंकता आल्या; त्यातल्या 10 जागा मुंबई–उपनगर भागातील होत्या. यावरून ठाकरे ब्रँडची माय जमिनीवर टिकून असल्याचे स्पष्ट होते.

**राज ठाकरे - 'नरेटिव्ह'चे महारथी :** सभांमध्ये आकर्षक भाषणे, बाळासाहेबांच्या शैलीतील हल्लाबोल, वेगळी भाषा आणि प्रभावी मांडणी ही राज ठाकरे यांची ताकद मानली जाते. महाविकास आघाडीकडे आतापर्यंत एक मजबूत "नरेटिव्ह ड्रायव्हर" नव्हता. राज ठाकरे आघाडीला तो मिळवून देऊ शकतात. बोगस मतदारांवर राज ठाकरेंनी लावलेला 9.6 लाख मतदारांचा आरोप हे त्याचे ताजे उदाहरण.

भाजपने हा मुद्दा तत्काळ हाताळण्यासाठी चार दिवस मोहीम राबवली. यावरूनच राज ठाकरे अजूनही राजकीय गोट्यांना हलवण्याची क्षमता ठेवतात हे स्पष्ट होते.

गेल्या दशकात राज ठाकरेंवर धरसोडीच्या आरोपांची टीका झाली- कधी भाजपसोबत, कधी विरोधात, कधी स्वतंत्र. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी आहे.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत जवळीक वाढल्याने ठाकरे बंधूंची एकत्रित लढाई मुंबईतील राजकारणावर मोठा परिणाम करू शकते.

उद्धव ठाकरेंचा प्रभाव कमी झाल्यास ठाकरे ब्रँडचा ऱ्हास होईल, त्याचा परिणाम मनसेवरही होईल - हे समीकरण राज ठाकरे चांगले समजतात. त्यामुळेच त्यांनी 'लास्ट स्टँड' म्हणावा अशी करो या मरो भूमिका घेतल्याचे चित्र आहे.

### भाजप–शिंदे गटासाठी आव्हान

- मनसे व MVA एकत्र आल्यास
- विरोधी मतांचे ध्रुवीकरण थांबेल
- ठाकरे ब्रँड + राज ठाकरे भाषणशैली
- मुंबई–उपनगरात आव्हान
- स्थानिक मनसे शक्ती
- आघाडीला जोडणारा 'बॅलन्सर' ठरू शकते

**मुद्दे-नियंत्रण**

- राज ठाकरेंच्या अजेंड्यावर BJP खेळण्याची वेळ येऊ शकते
- स्थानिक स्वराज्य निवडणुकांत MNS भूमिका
- MVA ला 'ग्राउंड' बळ

राज ठाकरे यांचे राजकारण पूर्वी फक्त सभांपुरते मर्यादित, संघटनात्मकदृष्ट्या कमजोर असल्याचे मानले जात होते. मात्र यावेळी परिस्थिती वेगळी आहे-

महाविकास आघाडीचा पाठिंबा, ठाकरे ब्रँडचा प्रभाव, निवडक मतदारसंघांत मनसेची 'वोट बँक', राज ठाकरे यांची भाषणशैली आणि अजेंडा सेट करण्याची क्षमता

**"आर या पार" भूमिका**...या सर्व गोष्टी एकत्र येऊन मुंबईसह महाराष्ट्रातील निवडणुकांत नवा कलाटणी देऊ शकतात. यामुळे "राज ठाकरे यांना हलक्यात घेणे BJP–शिंदे युतीसाठी महागात पडू शकते" हा अंदाज बळावू लागला आहे.

### प्रॅक्टिकल एक्सांपल

**खडकवासला मतदारसंघ**

**खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण पाहिले तर:**

**भाजपचे उमेदवार भीमराव तापकीर यांना 1,06,131 मतं**

**राष्ट्रवादी दोडके - 1,01,000+ मतं**

**मनसेचे वांजळे - 42,000 मतं**

**या ठिकाणी जर मनसे व महाविकास आघाडी एकत्र असते, तर भाजपला विजय मिळवणे अवघड झाले असते. हे समीकरण इतर ठिकाणी लागू झाल्यास मनसे निर्णायक ठरू शकते, असा संकेत यामुळे मिळतो.**





दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०१ नोव्हेंबर २०२५











# खडकवासला मतदारसंघात मतदार यादीत मोठा घोळ!

## तब्बल ५४ हजार बोगस मतदारांचा भूपेंद्र मोरे यांच्याकडून पर्दाफाश

## "प्रशासनाने तात्काळ दुरुस्ती करावी, अन्यथा आम्ही कोर्टात जाऊ" : मोरे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत मोठा घोळ झाल्याचा आणि तब्बल ५४ हजार बोगस मतदारांची नावे असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी केला आहे. या दाव्यामुळे खडकवासला परिसरात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आपल्या जनसंपर्क कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेदरम्यान भूपेंद्र मोरे यांनी प्रत्यक्ष डेमो दाखवत बोगस नावांची उदाहरणे सादर केली. ते म्हणाले, "मतदार यादीत एकाच व्यक्तीची दोन-दोन ठिकाणी नावे दिसत आहेत. काही मृत व्यक्तींची नावे अजूनही कायम ठेवण्यात आली आहेत. ही मोठी बेपर्वाई असून लोकशाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे."

**मोरे पुढे म्हणाले, "प्रशासनाने तात्काळ या मतदार यादीची दुरुस्ती करावी. बोगस व डुप्लिकेट नावे वगळून नवी, शुद्ध यादी प्रसिद्ध केली पाहिजे. अन्यथा आम्हाला कोर्टात जाण्याशिवाय दुसरा मार्ग राहणार नाही." त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जर हा प्रकार ठराविक राजकीय पक्षाला फायदा करून देण्यासाठी केला जात असेल, तर हा लोकशाहीवरील डाव आहे. अशा कटांचा पर्दाफाश केल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही." मोरे यांनी नागरिकांना आवाहन केले की, "आपले नाव मतदार यादीत योग्य आहे का, हे प्रत्येकाने तपासावे. जनतेच्या मतांचा सन्मान राखण्यासाठी सगळ्यांनी पुढे यावे." या खुलाशामुळे खडकवासला मतदारसंघात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अनेक नागरिकांनी प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.**

## वर्ल्ड स्ट्रोक डे निमित्त अत्याधुनिक न्युरो सेंटरचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वर्ल्ड स्ट्रोक डे निमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे येथे अत्याधुनिक ॲडव्हान्स्ड न्युरो सेंटरचे भव्य उद्घाटन करण्यात आले. हे केंद्र विविध न्युरोलॉजिकल आणि न्युरोसर्जिकल आजारांसाठी सर्वसमावेशक आणि अत्याधुनिक उपचार सुविधा प्रदान करणारे असून, रुग्णांच्या सर्वांगीण न्युरो केअर साठी एकाच छताखाली अनेक सेवा उपलब्ध करून देते. या केंद्रात पेडियाट्रिक न्युरोफिजिशियन क्लिनिक (मुलांचे मेंदू आणि नर्व्ह केअर), स्पाईन करेक्शन क्लिनिक (कायफोसिस आणि स्कोलियोसिस), ॲडव्हान्स्ड आणि मिनिमली इनव्हेसिव्ह न्युरोसर्जरी क्लिनिक, व्हर्टिगो क्लिनिक (बॅलन्स, चक्कर येणे व इनर इअर केअर), न्युरो इंटरव्हेन्शन क्लिनिक (स्ट्रोक, अँजिओग्राफी आणि ॲडव्हान्स्ड व्हॅस्क्युलर केअर), न्युरो डायग्नॉस्टिक्स (EEG, NCV, EMG, VEP, BERA) आणि एपिलेप्सी क्लिनिक अशा विविध विशेष सेवा सुरु करण्यात आल्या आहेत.

## दै. 'आरंभ पर्व'च्या लोणीकाळभोर प्रतिनिधीपदी मा. श्री. दुंडे

**लोणीकाळभोर (दै. आरंभ पर्व)**

लोणीकाळभोर (ता. हवेली) येथील समाजकारण, ग्रामविकास आणि पत्रकारितेची आवड जपणारे मा. श्री. चंद्रकांत दुंडे यांची दै. आरंभ पर्व वर्तमानपत्राच्या लोणीकाळभोर प्रतिनिधीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुका व परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार मित्रमंडळात आनंदाचे वातावरण आहे.

चंद्रकांत दुंडे हे गेली अनेक वर्षे सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून ग्रामविकास, लोकसहभाग, शैक्षणिक-सांस्कृतिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन यांसह स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत आहेत. स्थानिक समस्या शासनदरबारी पोहोचवून त्या मार्गी लावण्याची त्यांची कार्यशैली उल्लेखनीय आहे.



**यावेळी दै. आरंभ पर्वच्या मुख्य संपादिका सौ. सुरेखा मते, निवासी संपादक मा. श्री. लक्ष्मण साबळे, मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे, समूह संपादक विश्वासराव आरोटे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

स्थानिक पातळीवरील साधा-सोपा संवाद, लोकांशी स्नेहपूर्ण नाते आणि बातमी संकलनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन यामुळे दुंडे यांचे कार्य लक्षणीय ठरले आहे. त्यांच्या निवडीमुळे लोणीकाळभोर व परिसरातील घडामोडींचा जागरूक व विधायक पद्धतीने उजाळा मिळण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी आरंभ पर्वचे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे म्हणाले की, "चंद्रकांत दुंडे यांची समाजाभिमुख बांधिलकी, प्रामाणिकपणा आणि कार्यतत्परता लक्षात घेऊन त्यांची प्रतिनिधीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून जनतेच्या समस्या, चळवळी आणि स्थानिक यशकथांचा आवाज वृत्तपत्राद्वारे अधिक प्रभावीपणे पोहोचेल," अशी भावना व्यक्त करण्यात आली.

चंद्रकांत दुंडे यांनी प्रतिनिधीपदी निवड झाल्याबद्दल समाधान व्यक्त करताना, "लोकांचा विश्वास आणि सहकार्य हेच माझे बळ असून, स्थानिक प्रश्नांना न्याय देण्यासाठी मी बांधील राहीन. वस्तुनिष्ठ, निष्पक्ष आणि जनहिताच्या दृष्टीने बातमी सादर करण्याचा प्रयत्न करीन," असे प्रतिपादन केले.

स्थानिक सामाजिक संघटना, विविध मंडळांचे पदाधिकारी व नागरिकांनी दुंडे यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यामुळे लोणीकाळभोरातील प्रश्न, उपक्रम आणि विकासकामांना नव्या स्वरूपात अधोरेखित होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### इंदिरा गांधी व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यानां अभिवादन

**पुणे (आरंभ पर्व) : माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्या पुण्यतिथी व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त काँग्रेस भवन येथे अभिवादन करण्यात आले. पुणे काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या हस्ते स्व. इंदिरा गांधी व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. जनसामान्यांच्या उन्नतीसाठी स्व.इंदिरा गांधी यांनी दुरदृष्टीने कल्याणकारी योजना सुरू केल्या. त्या आजही उपयुक्त आहेत. देशाच्या विकासाला त्यांनी चालना दिली व सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशात शांतता व एकता कायम रहावी यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे सर्वांना कायम स्मरण राहील.असे चव्हाण पाटील यांनी सांगितले. काँग्रेसचे पुणे जेष्ठ नेते श्रीकृष्ण बराटे , जेष्ठ नेते सोपानराव मस्के ,रघुनाथ यादव, हवेली तालुका अध्यक्ष किसन काँग्रेस शंकरराव दांगट, सेवादल प्रदीप जाधव, खडकवासला उपाध्यक्ष संजय अभंग,खडकवासला काँग्रेस युवक अध्यक्ष विश्वजित जाधव,आदी उपस्थित होते.**



### मधल्या तालमीचे कुस्तीपटू हितेश पाटील यांचे राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णयश

**खडकवासला : (आरंभ पर्व) : मधली तालीम येथे नियमित सराव करणारे कुस्तीपटू हितेश पाटील यांनी बेळगाव (कर्नाटक) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १२५ किलो गटात सुवर्णपदक पटकावले आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे खडकवासला तालमीचा मान उंचावला आहे. या विजयामुळे हितेश पाटील यांची आगामी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी उझबेकिस्तान येथे २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश खडकवासला परिसरातील खेळाडूंना मोठी प्रेरणा देणारे ठरले आहे. मधली तालमीच्या वतीने हितेश पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशिक्षक, सहकारी कुस्तीपटू आणि तालमीचे ज्येष्ठ सदस्य उपस्थित होते. तालमीसाठी हा एक सुवर्ण क्षण असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.**

## मुख्यमंत्री सहय्यता निधीसाठी NAREDCO च्या वतीने एक कोटींची मदत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी NAREDCO संस्थेच्या माध्यमातून 1,01,00,000/- (एक कोटी एक लाख रुपये)च्या निधीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांतदादा पाटील, NAREDCO संस्थेचे अध्यक्ष श्री भरत अग्रवाल, खडकवासला गावचे माजी सरपंच श्री.संतोष उर्फ दिवाकर शिवाजी मते आणि NAREDCO संस्थेच्या संचालक मंडळातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.




मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत संपूर्ण राज्यात गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना तात्काळ व पारदर्शक पद्धतीने आर्थिक मदत मिळवून दिली जात आहे. त्यासोबतच सोलापूरसह मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीने बाधित कुटुंबांना मदत केली जात आहे. त्यामुळे ही योजना केवळ आर्थिक मदत न देता गरजूंसाठी जगण्याची नवी उमेद निर्माण करणारी सामाजिक बांधिलकी सिद्ध झाली आहे. त्यामुळे NAREDCO संस्थेनेही सामाजिक बांधिलकीतून 1,01,00,000/- (एक कोटी एक लाख रुपये)चा निधीचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना त्यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी सुपूर्द केला. यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, NAREDCO या संस्थेचे अध्यक्ष श्री भरत अगरवाल, खडकवासला गावचे माजी सरपंच *श्री.संतोष उर्फ दिवाकर शिवाजी मते आणि NAREDCO संस्थेच्या संचालक मंडळातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, या योगदानाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनीही संस्थेचे आभार मानले. तसेच, संस्थेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.




# नऱ्हे-धायरी-वडगावच्या विकासासाठी जाधव पती-पत्नी कटिबद्ध!

**• "सत्तेचा नाही, परिवर्तनाचा ध्यास..." पै. युवराज शेठ जाधव**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शेतीचा वारसा, कुस्तीची ओळख आणि समाजसेवेचा श्वास - या तिन्हींचा सुंदर संगम म्हणजे समाजसेवक आणि कुस्तीप्रेमी पै. युवराज शेठ जाधव. वडगाव परिसरातील प्रभाग क्रमांक ३४ मध्ये विकास आणि परिवर्तनाचा ध्यास घेऊन ते व त्यांच्या पत्नी मंजिरी युवराज जाधव जनतेत नवी आशा जागवत आहेत.

शेतकरी कुटुंबात जन्मलेले युवराजशेठ बालपणापासूनच कुस्ती क्षेत्राशी जोडलेले आहेत. राष्ट्रीय तालीम संघाचे सदस्य असलेले जाधव यांनी अनेक तरुण कुस्तीपटू घडवले. त्यांच्या व्यक्तिमत्वात मातीतली झळाळी आणि समाजसेवेची ओलावा एकत्र दिसतो. कुस्तीच्या माध्यमातून त्यांनी केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, विलास कथुरे सर यांसारख्या मान्यवरांशी आत्मीय नातं जोडलं.




त्यांचे आजोबा कै. विठ्ठल जाधव (माजी उपसरपंच), वडील चंद्रकांत विठ्ठल जाधव आणि चुलते बाळासाहेब जाधव - या तिन्ही पिढ्यांनी समाजसेवेची परंपरा रुजवली. युवराजशेठ आज ती परंपरा जोपासत नवा विचार रुजवत आहेत.

कोरोना काळात त्यांनी गरजू कुटुंबांना अन्नधान्य, औषधे आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. प्रत्येक वाढदिवस सामाजिक पद्धतीने साजरा करून ते म्हणतात -

"वाढदिवस फुलांच्या गुच्छांनी नव्हे, तर समाजाच्या सेवेत साजरा व्हावा - हाच माझा उत्सव."

सद्गुरु संत बाळूमामा यांचे भक्त असलेले युवराजशेठ धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. खेळ आणि तरुणांच्या प्रगतीसाठी ते स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि मैदाने उभारण्याच्या ध्येयाने कार्यरत आहेत.

"आजची मुले मोबाईलच्या आहारी गेली आहेत; त्यांना मैदानावर आणणं हेच माझं पहिलं लक्ष्य आहे," असे ते सांगतात.

पत्नी मंजिरी जाधव या वाल्हेकर कुटुंबातील असून, दोघांचं बंधन केवळ वैवाहिक नाही तर समाजकारणाच्या समान ध्येयाने बांधलेलं आहे. युवराज जाधव यांचे वडील दोन वेळा ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत; त्यामुळे जाधव परिवाराचा राजकीय आणि सामाजिक पाया मजबूत आहे.

"आम्ही नवे नेते नाही, नवा विचार आहोत. सत्तेचा नाही, तर परिवर्तनाचा ध्यास घेतला आहे," असं जाधव दांपत्य भावनिकपणे सांगतं.

नऱ्हे-धायरी-वडगाव परिसरात अजूनही काही मूलभूत सुविधा अभावात आहेत. त्या पुरवण्यासोबतच नागरिकांसाठी क्रीडांगणे, बगीचे, सार्वजनिक केंद्रे उभारण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला आहे.

प्रभाग क्रमांक ३४ मधील जनतेशी असलेले जाधव परिवाराचे स्नेहसंबंध आणि समाजकार्यातील सातत्य पाहता, त्यांच्या प्रयत्नांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नऱ्हे-धायरी-वडगावचा सर्वांगीण विकास हाच जाधव दांपत्याचा ध्यास आहे . या भागातील वाहतूक कोंडी कमी होऊन सर्वसामान्यांना मोकळा श्वास मिळावा अशी त्यांची भावना आहे. सर्वांना हेवा वाटेल असा प्रभाग बनवण्याची जाधव दांपत्याची इच्छा आहे...



**आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे हे मात्र नक्की!!**

- समाप्त

## थोडक्यात पण महत्वाचे



### "थांब दादा... घाण पाणी वाहतंय!"; धायरीकरांचा आक्रोश, पण...

- निलेश दमिष्टे यांच्या कार्याचे कौतुक

**धायरी (आरंभ पर्व) :** धायरीच्या डी.एस.के. चौकाजवळील चामुंडा हॉटेल शेजारी आज पहाटेपासून घाण पाणी रस्त्यावर वाहत होते. ड्रेनेज लाईन फुटल्याने सगळीकडे दुर्गंधी पसरली. लोकांना रस्ता ओलांडणंही कठीण झालं. कामावर जाणारे लोक, शाळकरी मुलं, वृद्ध - सगळे त्रस्त झाले. सगळ्यांच्या तोंडून एकच आवाज -"थांब दादा... घाण पाणी वाहतंय!" : तेवढ्यात सामजिक कार्यकर्ते निलेश दमिष्टे तिकडे आले. त्यांनी लगेचच हा प्रकार पाहून पुणे महानगरपालिकेला माहिती दिली आणि सोशल मीडियावरून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या या तातडीच्या प्रयत्नांमुळे उपायुक्त प्रज्ञा पोतदार यांनी तत्काळ पथक पाठवलं. गेटिंग मशीनने काम करून फक्त एका तासात ड्रेनेजचं पाणी थांबवण्यात आलं. जिथे काही वेळापूर्वी घाण वाहत होती, तिथे आता दिलासा दिसू लागला. धायरीकरांनी दमिष्टे यांचे मनापासून आभार मानले. "आम्हाला घाण पाण्याचा विकास नको, आम्हाला स्वच्छ धायरी हवी," असं नागरिकांनी भावनिकपणे सांगितलं. एका सोशल पोस्टने प्रशासन हलवलं आणि धायरीला पुन्हा श्वास घेता आला.

### साजरा करा 'फूल ऑन हॅलोवीन' फक्त अॅन्ड पिक्चर्स वाहिनीवर!




**मुंबई (आरंभ पर्व) :** सज्ज व्हा एक दिवसाच्या धमाल, हॉरर आणि भयावह अॅडव्हेंचरसाठी कारण यावेळी हॅलोवीन होणार आहे 'ऑन नाही तर फूल ऑन', फक्त अॅन्ड पिक्चर्सवर! 31 ऑक्टोबरला दिवसभर प्रसारित होणार आहे फूल ऑन हॅलोवीन. तरुण प्रेक्षकांशी असलेल्या सखोल नात्यासाठी ओळखली जाणारी अॅन्ड पिक्चर्स वाहिनी घेऊन येत आहे - मौज, ताजेपणा आणि थराराने भरलेला अनुभव, जो त्यांना अगदी आपलासा वाटतो! तयार व्हा "जंप स्केअर्स" ऐवजी "फन स्केअर्स" साठी, कारण अॅन्ड पिक्चर्स तुम्हांला आमंत्रित करत आहे एका अविस्मरणीय हॅलोवीन मूव्ही मॅरेथॉनसाठी - ज्यात असेल शहारा उभे करणारे क्षण, खळखळून हसवणारे प्रसंग आणि भुतांची धमाल सरप्राइजेस! सिनेमॅटिक थरार आणि मजेने भरलेला एक दिवस देण्याचे वचन देत, 'फुल ऑन हॅलोवीन' घेऊन येत आहे धमाल चित्रपटांची मालिका: काकुडा - सोनाक्षी सिन्हा आणि रितेश देशमुख यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या ह्या रहस्यमय कथेमध्ये एका छोट्या गावातील गूढ आणि भयानक रहस्ये उलगडतात - सकाळी 8:45 वाजता; द भूतनी - संजय दत्त, पलक तिवारी आणि मौनी रॉय यांच्या भूमिकांनी सजलेला हा चित्रपट प्रेक्षकांना भूतांच्या खोडकर पण मोहक दुनियेत नेतो - दुपारी 3:15 वाजता.







# लोणी काळभोर पोलिस ठाण्यातर्फे एकता दौड स्पर्धेचे आयोजन

**श्री.चंद्रकांत दुंडे**



> आजपर्यंतच्या इतीहासात लोणी काळभोर पोलीस ठाणे हद्दीत अशाप्रकारचे उत्कृष्ठ व नियोजनबध्द कार्यक्रमाचे आयोजन पोलीस प्रशासनाचे वतीने पहिल्यांदाच करणेत आले असल्याची चर्चा, लोणी काळभोर व पंचक्रोषीतील नागरीकांमध्ये आहे. या कार्यक्रमाचे माध्यमातुन राष्ट्रीय एकता, सार्वभौमता व जातीय सलोखा याचे उत्तम दर्शन घडले. त्याबाबत सर्वत्र लोणी काळभोर पोलीसांचे तसेच पुणे शहर पोलीस दलाचे कौतुक केले जात आहे.

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती व राष्ट्रीय एकता दिनाचे औचीत्य साधुन मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे आदेशानुसार तसेच मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाप्रमाणे, लोणी काळभोर पोलीस ठाणे चे वतीने दि. ३१/१०/२०२५ रोजी सकाळी ०७/०० वा. एकता दौड (RUN FOR UNITY) चे आयोजन करणेत आले होते.

सदर एकता दौडमध्ये लोणी काळभोर परिसरातील जेष्ठ नागरिक, पूर्व हवेली असोसिएशन चे डॉक्टर्स, महाराष्ट्र केसरी पै. राहुल काळभोर, उप महाराष्ट्र केसरी श्री भरत मस्के, मुंबई महापौर केसरी पै. दत्तात्रय (आबा) काळे, नॅशनल बॉक्सर चॅम्पियन कु. सृष्टी विजय जाधव त्याचप्रमाणे लोणी काळभोर व कदम वस्ती चे सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, खेळाडू, डान्स अकॅडमी चे विद्यार्थी, पंचक्रोशीतील बचत गटाच्या महिला तसेच लोणी काळभोर पोलीस स्टेशन, हडपसर वाहतूक विभाग व इतर ठिकाणी नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.

सुमारे ९८० सदस्य सदर एकता दौडमध्ये सहभागी झाले होते. त्यापैकी पुरुष ६७२ व ३०८ महिला सदस्य सहभागी झाल्या होत्या. सदर एकता दौड सुमारे ३ कि. मी. अंतराची ठेवणेत आली होती. सकाळी ०७/०० वा. लोणी काळभोर पोलीस ठाणे येथुन प्रथम पुरुष गटाची व तदनंतर महिला गटाची अशा दोन स्वतंत्र एकता दौड घेणेत आल्या. पालखी मैदान, कदमवाकवस्ती, पुणे येथे एकता दौड चे अंतीम टोक होते. सदर एकता दौड मध्ये सहभागी झालेल्या सदस्यांपैकी ज्यांनी दौड पुर्ण करुन प्रथम आले अशा पुरुष गटातुन व महिला गटातुन प्रत्येकी ३ क्रमांक पंचांचे निवडीणे काढणेत आले व त्यांना राष्ट्रीय स्तरावर क्रिडा पुरस्कार विजेते खेळाडु यांचे हस्ते ट्राफी, मेडल व सन्मानचिन्ह देवुन गौरवीणेत आले.

पारितोषीक वितरणानंतर शालेय विद्यार्थ्यांचा विवीध गुणदर्शनपर कार्यक्रम पार पडला. तदनंतर एकता दौड चे माध्यमातुन सरदार वल्लभभाई पटेल यांचे जिवनचरीत्र व त्यांचे अमुल्य व पैतेहासीक कामगीरीबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पन्हाळे यांनी माहिती दिली. त्यानंतर प्रमुख पाहुने व मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती स्मिता पाटील लोणी काळभोर पोलीस ठाणे पुणे शहर यांनी केले व राष्ट्रगीताने सदर कार्यक्रमाची सांगता करणेत आली.

## क्रीडा स्पर्धांमध्ये स्वप्नाली सावंत, तणेश भोसले यांचे यश



**श्री. किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)** क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा परिषद शालेय विभागस्तरीय मैदानी स्पर्धा न श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील स्वप्नाली सावंत हिचा उंच उडी प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक येऊन तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच ८०० मीटर धावणे स्पर्धेमध्ये तनेश भोकसे याने तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल खेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड.देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर, पर्यवेक्षक एस.टी फुंदे, प्रा. उमेश जगताप, प्रा. अशोक थिगळे, उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.योगेश मोहिते, प्रा.सारिका गोरे, प्रा. तानाजी पिंगळे यांनी मार्गदर्शन केले.




## धायरी येथे शिव–पार्वती विवाह सोहळा उत्साहात संपन्न

- धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणात परिसरातील भाविकांची मोठी उपस्थिती

> धार्मिक व सांस्कृतिक वातावरण हवे यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद लाभला.. आगामी काळातही विविध उपक्रम राबवले जातील. - दत्ताभाऊ कोल्हे, आयोजक

**धायरी (दै. आरंभ पर्व)** खडकवासला, नांदेड, वडगाव आणि धायरी परिसरातील भाविकांच्या उपस्थितीत शिव–पार्वती विवाह सोहळा अत्यंत पारंपरिक उत्साहात पार पडला.

धायरीतील धारेश्वर महादेव संस्थान व भैरवनाथ मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आणि दत्तात्रय कोल्हे , धनश्री कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शिव–पार्वतींच्या मंगलमय विवाह प्रसंगी संगीत, नृत्य, आणि भक्तिभावाचा संगम अनुभवायला मिळाला. 'महागंगा आरती'ने संपूर्ण वातावरण अधिक भक्तिमय झाले. पारंपरिक पद्धतीने साजऱ्या या सोहळ्याने परिसरातील सांस्कृतिक मूल्यांना नवचैतन्य दिले..

यावेळी भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, सचिन दांगट, गंगाधर भडावळे, किशोर पोकळे, बापूसाहेब पोकळे, सुभाष नाणेकर, देविदास रायकर, दत्ता रायकर, हेमेंद्र जोशी, सचिन लांबाते, तुषार पोकळे, रोहन तपकिरी जयश्री पोकळे, रश्मी घुले, मनीषा मोरे, ममता दांगट आदी मान्यवर उपस्थित होते.

शिव–पार्वती विवाह सोहळा आणि महागंगा आरतीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले.

## लोणी काळभोर ग्रामपंचायत सरपंचपदी नागेश काळभोर



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)** पूर्व हवेलीतील मोठ्या लोकसंख्येच्या लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सर्वसामान्य कुटुंबातील नागेश अंकुश काळभोर यांची बिनविरोध निवड झाली आहे. सरपंच राहुल दत्तात्रय काळभोर यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झाले होते.निवडणूक निर्णय अधिकारी संदीप झिंगाडे, लोणी काळभोरचे मंडलाधिकारी लक्ष्मण बांडे, ग्रामविकास अधिकारी सतीश गवारी यांनी दिलेल्या माहितीनुसार विहित वेळेत सरपंचपदासाठी नागेश काळभोर यांचा एकमेव अर्ज आल्याने मंडल अधिकारी लक्ष्मण बांडे यांनी नागेश काळभोर यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. नागेश काळभोर यांची बिनविरोध निवड होताच कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून व फटाक्यांची आतषबाजी करीत मोठा जल्लोष केला. नागेश काळभोर हे लोणी काळभोर येथील सिद्राम मळा येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असुन जनसामान्यात मिसळणारे व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख आहे.

निवड जाहीर होताच महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर, बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, माजी सरपंच राजाराम काळभोर, माजी उपसरपंच आण्णासाहेब काळभोर, गणेश कांबळे, बापू बोरकर, राजेंद्र काळभोर, बाळासाहेब काळभोर, संजय गायकवाड, सविता जगताप, सामाजिक कार्यकर्ते सचिन काळभोर,

राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष युवराज काळभोर आदींनी त्यांचे स्वागत केले. मागील सरपंचपदाच्या निवडणुकीत नागेश काळभोर यांचा एका मताने पराभव झाला होता. सत्ताधारी गटाचे एक मत फुटल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सत्ताधारी गटाला मिळालेली सत्ता गमवावी लागली होती. विरोधी स्पर्धक राहुल काळभोर यांचा सरपंचपदी ९ विरुद्ध ८ मतांनी विजय झाला होता. आज नागेश काळभोर यांचा वाढदिवस व त्यांना या वाढदिवसानिमित्त सत्ताधारी व विरोधकांनी मोठे गिफ्ट दिले आहे.

त्यामुळे वाढदिवस व आज मिळालेले सरपंचपद हा दुग्धशर्करा योग जुळून आल्याने नागेश काळभोर यांच्यासह परिसरातील नागरिक आनंद व्यक्त करत आहेत. यावेळी सरपंच नागेश काळभोर म्हणाले की, बिनविरोध निवडून दिल्याबद्दल सर्व सहकाऱ्यांचे आभार. आगामी काळात ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गट-तट न पाहता आपल्या सर्व सदस्यांना सोबत घेऊन गावाचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी आपण प्रयत्नशील राहणार आहोत.

## 'नतमस्तक' या मराठी चित्रपटाची पोस्टर लॉंचद्वारे घोषणा



**पुणे (दै. आरंभ पर्व)** नवनवीन विषयांवरील प्रयोगशील चित्रपटांची थोर परंपरा लाभलेल्या मराठी सिनेसृष्टीत आणखी एका अनोख्या विषयावर आधारलेला चित्रपट बनविण्यात येत आहे. समाजाभिमुख चित्रपटांना नेहमीच प्रेक्षकांचा कौल मिळाला आहे. त्यामुळेच समाजाला आरसा दाखविणाऱ्या चित्रपटांची निर्मिती होत असते. नुकतीच घोषणा करण्यात आलेला 'नतमस्तक' हा मराठी चित्रपट याच वाटेवरील पुढचे पाऊल आहे. या चित्रपटात नेमके काय पाहायला मिळेल याची उत्सुकता वाढविण्याचे काम पोस्टर करीत आहे.

निर्माते रमेश वामनराव शिंदे यांनी आर. एस. गोल्डन ग्रुप मुव्ही मेकर्सच्या बॅनरखाली 'नतमस्तक' चित्रपटाची निर्मिती केली आहे.

# सिग्नेचर ग्लोबलकडून नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सद्वारे ८.७५ अब्ज रुपयांची उभारणी

**मध्यम उत्पन्न आणि शाश्वत गृहनिर्माण प्रकल्पांना करणार निधी पुरवठा**

SIGNATURE GLOBAL® — REALTY. RELIABILITY. RESPONSIBILITY.

**मुंबई (दै. आरंभ पर्व)** भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपरपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडने जागतिक बँक समूहाचा सदस्य असलेल्या इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशनकडे (आयएफसी) नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सच्या (एनसीडी) खासगी प्लेसमेंटद्वारे ८.७५ अब्ज रुपयांची उभारणी करण्याची आज घोषणा केली.

सिग्नेचर ग्लोबल या उत्पन्नाचा उपयोग मध्यम उत्पन्न आणि शाश्वत गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्यासाठी करणार आहे. तसेच विद्यमान कर्ज कमी करण्यासाठीही त्यातील काही भागाचा उपयोग होणार आहे. या एनसीडीला केअरएज रेटिंग्सने 'ए+' रेटिंग दिलेली असून ते यापूर्वीच बीएसईवर सूचीबद्ध झाले आहेत. हा सिग्नेचर ग्लोबलचा पहिला सूचीबद्ध कर्ज व्यवहार असून त्यामुळे कंपनीची भांडवली बाजारातील उपस्थिती मजबूत होणार आहे.

या एनसीडीचा कालावधी ३ वर्षे, २ महिने आणि ३० दिवस असा आहे. हे एनसीडी १५ जानेवारी २०२९ रोजी मॅच्युअर होणार आहेत. सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडचे संस्थापक आणि अध्यक्ष प्रदीप अग्रवाल म्हणाले, "आमच्या स्थापनेपासूनच आम्ही ग्राहकांचे समाधान, वितरण आणि पारदर्शकता या प्रमुख स्तंभांवर लक्ष केंद्रित केले आहे. आयएफसीसारख्या प्रतिष्ठित संस्थेने आमच्यावर दाखवलेला विश्वास हा आमचा दृष्टिकोन आणि दिशा याची साक्ष देतो. सिग्नेचर ग्लोबल ग्रुपवरील आयएफसीच्या विश्वासाबद्दल आम्ही खरोखरच त्यांचे आभारी आहोत. पर्यावरणाबद्दल जागरूक डेव्हलपर या नात्याने उच्च-गुणवत्तेचे, टिकाऊ मध्यम-उत्पन्न गृहनिर्माण प्रकल्प वितरीत करण्यासाठी आणि भविष्यातील सर्व प्रकल्पांमध्ये मजबूत ईएसजी मानके लागू करण्यासाठी सिग्नेचर ग्लोबल कटिबद्ध आहे."

भारताच्या वेगवान शहरीकरणामुळे दर्जेदार घरांची अत्यावश्यक उपलब्धता वाढवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. एकट्या टियर १ आणि टियर २ शहरांमध्ये १ कोटी ८० लाख अतिरिक्त युनिट्सची आवश्यकता पडणार आहे, असा एक अंदाज असून २०२२ आणि २०२७ दरम्यान आणखी ३० लाखांची गरज असल्याचा अंदाज आहे.

या गुंतवणुकीविषयी भाष्य करताना आयएफसीचे दक्षिण आशियाचे प्रादेशिक विभाग संचालक इमाद एन. फखोरी म्हणाले, "गृहनिर्माण हा भारताच्या प्रगतीचा मूलभूत आधारस्तंभ आहे. तसेच समावेशक विकासासाठी संधीचा विस्तार करणे ही संधी आणि अत्यावश्यकता असे दोन्ही आहेत. दीर्घकालीन भागीदार असलेल्या सिग्नेचर ग्लोबलच्या डॅक्सिन प्रकल्पात आयएफसीच्या गुंतवणूकीद्वारे, ज्या कुटुंबांना त्यांची सर्वात जास्त गरज आहे अशा कुटुंबांसाठी उच्च-गुणवत्तेची, मध्यम-उत्पन्न घरे देण्याचे आमचे लक्ष्य आहे. रोजगार निर्मिती आणि बाजारपेठेतील स्पर्धात्मकतेला आधार पुरवतानाच ही भागीदारी कंपनीच्या टिकाऊपणाच्या धोरणास पुढे नेण्यास देखील मदत करेल. शहरी पायाभूत सुविधांना बळकटी आणण्यासाठी आणि भारतातील वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये लवचिक समुदाय तयार करण्यासाठी आम्ही एकत्रितपणे योगदान देत आहोत."

कंपनीची एकूण शाश्वतता रणनीती सुधारण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी आयएफसी ही जीआरआयपी (ग्रीनिंग रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट पोर्टफोलिओ) सल्ला-मसलत आधार पुरवणार आहे. तसेच डॅक्सिन प्रकल्पासाठी एक्सेलरेटिंग क्लायमेट-स्मार्ट अँड इन्क्लुझिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर इन साउथ एशिया प्रोग्राम अंतर्गत युरोपियन युनियनने आधार पुरविलेल्या एज (एक्सलन्स इन डिझाइन फॉर ग्रेटर एफिशिएन्सीज) अॅडव्हान्स्ड सर्टिफिकेशनपर्यंत पोहोचण्यास मदत करेल. सिग्नेचर ग्लोबलच्या एकूण १७ प्रकल्पांना एज प्रमाणपत्र मिळालेले असून ग्रीन बिल्डिंग कमिटमेंटच्या बाबतीत ती भारताच्या रिअल इस्टेट उद्योगात सर्वोच्च स्थानावर आहे. कंपनीच्या ईएसजी वचनबद्धतेला अलीकडेच ग्लोबल रिअल इस्टेट सस्टेनेबिलिटी बेंचमार्कने (जीआरईएस) मान्यता दिली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे शहरात हर्बल हुक्क्यावरही बंदी; पोलीस आयुक्तांची स्पष्ट भूमिका

पुणे (आरंभ पर्व) : 'राज्य शासनाने हुक्का पार्लरवर बंदी घातील आहे. मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात हर्बल हुक्क्याला परवानगी आदेश दिला आहे. मात्र, हर्बल हुक्क्यासह तंबाखूयुक्त हुक्का पार्लरवर बंदी घालण्यात आली आहे. बंदी आदेश धुडकाविणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल', असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शुक्रवारी दिला. मुंबई उच्च न्यायालयाने १४ ऑक्टोबर रोजी शहरातील रेस्टॉरंट, हॉटेलमध्ये तंबाखूविरहित हर्बल हुक्का देण्यास काही अडचण नाही. मात्र, तंबाखूजन्य हुक्का पार्लर चालविण्यास बंदी असल्याचे स्पष्ट केले होते. याबाबत मुंबईतील काही रेस्टॉरंट चालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या पार्श्वभूमीवर पुण्यातील रेस्टॉरंट आणि बार मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेतली. मुंबई उच्च न्यायालयाने हर्बल हुक्का पार्लरला परवानगी दिली असून, पुण्यातही हर्बल हुक्का पार्लर चालविण्यास परवानगी देण्याची मागणी शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांकडे केली. 'पुणे शहरात तंबाखूजन्य किंवा हर्बल हुक्का पार्लर चालविण्यास परवानगी नाही. हॉटेल, बार, रेस्टॉरंट चालकांनी हुक्का पार्लर चालवू नये. आदेशाचा भंग केल्यास कारवाई करण्यात येईल', असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला. 'शहरातील पबचालकांनी नियमावलीचे पालन करणे गरजेचे आहे. अल्पवयीनांना मद्य विक्री करू नये. तसेच, मध्यरात्री दीडपूर्वी पब बंद करावेत', असे आदेश पोलीस आयुक्तांनी पुन्हा दिले.




### जादा भाडे आकारणे पडले महागात; भरारी पथकाकडून वाहनांवर कारवाई

पिंपरी (आरंभ पर्व) : जादा भाडे आकारणे, मान्यता व क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या २५१ खासगी बस, वाहनांवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) भरारी पथकाने कारवाई केली. त्यांच्याकडून अडीच लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. गावाकडे जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून पिंपरी-चिंचवड आगारातून विविध मार्गांवर जादा गाड्या सोडण्यात आल्या होत्या. त्यानंतरही मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने अनेकांनी खासगी प्रवासी बसचा पर्याय निवडला. मात्र, या गोष्टीचा गैरफायदा घेत बस कंपन्यांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या. ही बाब निदर्शनास येताच पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग, तसेच भरारी पथकाकडून विविध वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये जादा भाडे आकारणे, मान्यता व क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणे, वाहनरचनेत बदल करणे, वाहनाची योग्य कागदपत्रे न बाळगणे, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. शहरातील महत्त्वाची स्थानके, प्रमुख महामार्गांवर या पथकांकडून तपासणी करण्यात आली. दोषी २२९ वाहनांवर, तसेच जादा भाडे आकारणाऱ्या २२ अशा २५१ वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख ४७ हजार पाचशे रुपयांचा दंड वसूल केला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खासगी प्रवासी वाहतूकदारांनी एसटी भाडे दरापेक्षा अधिक पैसे घेतल्यावर कारवाईचा इशारा दिला होता. भरारी पथकांकडून करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान दोषी आढळलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, असे पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.

# सत्त्वा ग्रुप आणि इनोव्हॅलसकडून जीसीसीबेस प्लॅटफॉर्म सादर

- भारतातील जागतिक क्षमता केंद्राच्या वाढीच्या पुढील टप्प्याला मिळणार बळकटी
- भारताच्या जागतिक क्षमता केंद्राच्या वाढीच्या पुढील टप्प्याला प्रशासन, तंत्रज्ञान आणि भागीदारीद्वारे संस्थात्मक बनविणारा धोरणात्मक उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा विकासकांपैकी एक असलेल्या सत्त्वा ग्रुपने इनोव्हॅलससोबत भागीदारीत जीसीसीबेस सादर करण्याची घोषणा केली आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांना संपूर्ण भारतात ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स स्थापन करण्यासाठी आणि त्यांचा विस्तार करण्यासाठी मदत करण्यासाठी डिझाइन केलेला हा एक धोरणात्मक प्लॅटफॉर्म आहे.

जीसीसीबेस हा पायाभूत सुविधांमधील सत्त्वा ग्रुपचे कौशल्य आणि इनोव्हॅलसच्या ऑपरेशनल उत्कृष्टतेवर आधारित असून तो जागतिक उद्योगांसाठी एकीकृत, एंड-टू-एंड इकोसिस्टम उपलब्ध करून देतो. हे उद्घाटन म्हणजे एक परवडणारे स्थान इथपासून ते नवोपक्रम, अभियांत्रिकी आणि डिजिटल परिवर्तनासाठी जागतिक केंद्रापर्यंतच्या भारताच्या उत्क्रांतीमधील महत्त्वाचा क्षण आहे. सखोल जागतिक व्यवसाय भारतात कसे स्थापित होतील आणि कसे वाढतील याची स्थानिक कौशल्य, धोरणात्मक भागीदारी आणि उद्योगातील माहितीचा वापर करून नव्याने व्याख्या करण्याचे जीसीसीबेसचे लक्ष्य आहे. त्यामुळे विनासायास, कार्यक्षम आणि अत्यंत प्रभावी जीसीसीचा विस्तार सुकर होणार आहे.

या घडामोडीसाठी ही अत्यंत योग्य वेळ आहे. एक परवडणारे स्थान म्हणून आपल्या ख्यातीच्या खूप पुढे जाऊन भारत नवोपक्रम, अभियांत्रिकी आणि डिजिटल परिवर्तनासाठी जगातील सर्वात गतिमान केंद्र म्हणून उदयास आला आहे. जागतिक कंपन्या आता भारताविषयीच्या धोरणाची नव्याने आखणी करत आहेत. ते भारताकडे बॅक ऑफिस म्हणून नाही तर एक नाविन्यशीलतेचे ऊर्जाकेंद्र आणि धोरणात्मक वाढीचे इंजिन म्हणून पाहत आहेत. जीसीसीबेस हे या बदलाचे प्रतीक असून ते जागतिक उद्योगांना भारतात विनाअडथळा बांधकाम, विस्तार आणि कामकाज करणे शक्य होईल अशी एकीकृत, तंत्रज्ञान-सक्षम परिसंस्था उपलब्ध करून देते.

> **भारत सरकारच्या व्यवसाय सुलभता आणि डिजिटल-प्रथम कामकाजावर लक्ष केंद्रित करून, जीसीसीबेस प्रोग्राम मॅनेजमेंट टूल्स, कम्प्लायन्स मॉड्यूल्स आणि रिअल-टाइम डॅशबोर्ड यांचे एकत्रीकरण करते. त्यामुळे अनुमान करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. उदयोन्मुख व्यवसाय क्षेत्रांमध्ये भारताच्या विस्तारत्या प्रतिभा क्लस्टर्सचा लाभ घेऊन पारंपारिक महानगरांच्या पलीकडे नवीन वाढीची क्षेत्रे शोधण्यासाठी उद्योजकांना मदत करण्या दृष्टीनेही याची रचना करण्यात आली आहे.**

आज भारतात १,६०० हून अधिक जागतिक क्षमता केंद्रे असून ते २० लाखांहून अधिक व्यावसायिकांना रोजगार पुरवतात आणि वार्षिक ४६ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त आर्थिक मूल्य निर्माण करतात. ही केंद्रे आता केवळ व्यवहारांच्या प्रक्रियांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. ते आता उत्पादनाचे डिझाईन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा आणि प्रगत विश्लेषणात जागतिक प्रवाहांचे नेतृत्व करतात.

> **पायाभूत सुविधांची उत्कृष्टता आणि डिजिटल देखरेख यांची सांगड घालून जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे, उच्च मूल्य असलेले रोजगार निर्माण करणे आणि उद्यम नाविन्यशीलतेसाठी सर्वात विश्वासार्ह आणि सक्षम केंद्र म्हणून भारताची स्थिती मजबूत करणे हे जीसीसीबेसचे उद्दिष्ट आहे. "जगाचे कार्यालय" म्हणून भारत आपले स्थान मजबूत करत असताना बहुराष्ट्रीय कंपन्यांना आत्मविश्वासाने आणि हेतूपूर्वक भारतामधून बांधकाम, नवोन्मेष आणि नेतृत्व करण्यास सक्षम करणारे योग्य वेळेस व धोरणात्मक उत्प्रेरक म्हणून जीसीसीबेस उभे आहे.**

भारतात इ. स. २०३० पर्यंत २,५०० पेक्षा अधिक जीसीसी असतील, असा उद्योगाचा अंदाज आहे. त्यामुळे ११० अब्ज डॉलर्सची संधी निर्माण होईल आणि उच्च-कौशल्य क्षमतेच्या अतिरिक्त दहा लाख नोकऱ्या निर्माण होतील. नॅसकॉमच्या माहितीनुसार, जगातील शीर्ष २००० कॉर्पोरेशनपैकी ६० टक्क्यांहून अधिक कंपन्या भारतात आधीच कार्यरत आहेत किंवा जीसीसी स्थापन करण्याची योजना आखत आहेत. भारतातील प्रतिभांची विपुलता, डिजिटल पायाभूत सुविधा आणि धोरण स्थिरता यामुळे ते आकर्षित झाले आहेत.

ही गती मिळूनही जीसीसी स्थापन करणे विनाकारण गुंतागुंतीचे आहे. त्यामुळे रिअल इस्टेट, कायदापालन, प्रतिभा संपादन आणि ऑपरेशनल गव्हर्नन्समध्ये अनेक भागधारकांमधून वाट काढावी लागते. कंपन्यांना कागदपत्रांवर नव्हे तर नाविन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित करायचे आहे. सेटअप प्रक्रियेला संस्थात्मक रूप देऊन आणि गती, पारदर्शकता आणि कायदापालन प्रदान करणारा एकल, जबाबदार प्लॅटफॉर्म तयार करून जीसीसीबेस ही दरी भरून काढते.

सत्त्वा ग्रुपचे स्ट्रॅटेजिक ग्रोथचे उपाध्यक्ष शिवम अग्रवाल म्हणाले, जीसीसीबेसच्या लॉंचिंगमुळे भारतातील पहिल्या "स्पेस-टू-स्केल" प्लॅटफॉर्मचेसुद्धा पदार्पण झाले आहे. हे एक एकीकृत मॉडेल असून त्यामध्ये ग्रेड-ए रिअल इस्टेट, पॉड-आधारित जीसीसी डिलिव्हरी आणि डेटा-चालित प्रशासनाची पातळी एकत्र येते.

हे सर्व एकाच करारात, एसएलए आणि डॅशबोर्डमध्ये पॅकेज केले जाते. या एकात्मिक रचनेमुळे जागतिक उद्योगांना त्यांचे भारतातील कामकाज स्थापित करताना अनेकदा येणाऱ्या ऑपरेशनल अडचणी दूर होतील. त्यामुळे त्यांना पहिल्या दिवसापासूनच व्यवसायातील लाभांवर लक्ष केंद्रित करणे शक्य होईल.

# मोजणी पूर्ण झाल्यानंतर वाटाघाटीच्या बैठका

## मोबदल्यासाठी पाच हजार कोटींची शक्यता




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या जागांची मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मोबदल्याच्या दरनिश्चितीसाठीच्या वाटाघाटी सुरू झाल्या आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संमितपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांबरोबर शुक्रवारी चर्चा केली. भूसंपादनासाठी अंदाजे पाच हजार कोटी रुपयांचा निधी लागण्याचा जिल्हा प्रशासनाचा अंदाज आहे. पुरंदर विमानतळासाठी संमतिपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणीप्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आली आहे. पुरंदर तालुक्यातील एखतपूर, उदाचीवाडी, मुंजवडी, खानवडी, कुंभारवळण, खानवडी आणि पारगाव अशा सात गावांमधून १ हजार २८५ हेक्टर म्हजणचे तीन हजार एकर जमीन विमानतळासाठी संपादित करण्यात येणार आहे. त्यासाठी ३ हजार २०० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागा देण्यासंदर्भातील संमतिपत्रे जिल्हा प्रशासनाला दिली आहेत. मोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्याने दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर संमितपत्रे दिलेल्या शेतकऱ्यांबरोबर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी शुक्रवारी बैठक घेतली. जमिनीपोटीचा मोबदला वाढवून मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. यासंदर्भातील मोबदल्याची माहिती जिल्हादिकाऱ्यांकडून देण्यात आली. मोबदला वाढवून मिळावा, एरोसिटीमध्ये दहा टक्क्यांऐवजी जास्त जागा मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली. नवी मुंबई येथे शेतकऱ्यांना २२.५ टक्के जागा मिळाली, मात्र तेथे भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना पैसे मिळाले नसल्याची बाब यावेळी शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. पुरंदर येथील सात गावातील शेतकऱ्यांना जमिनीसाठी ठरलेल्या दराच्या चौपट रक्कम आणि त्यांच्या जमिनीच्या दहा टक्के जागा देण्यात येणार आहे. 'शेतकऱ्यांनी केलेल्या मागण्या राज्य शासनाला कळविण्यात येणार आहेत. मोबदला किती द्यायचा, याचा निर्णय राज्य शासनाकडून होईल. मात्र वाटाघाटीची पहिली बैठक झाली. यानंतरही काही बैठका होणार आहेत. जमिनीची मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्याने नक्की किती जमिनीचे संपादन आवश्यक आहे, त्याबाबतचा प्रस्तावही राज्य शासनाला पाठविण्यात येणार आहे. तो प्रस्ताव मान्य झाल्यानंतर मोबदल्याचा निर्णय होईल. त्यानंतर भूसंपादन आणि मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू होईल,' असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.

> **विमानतळासाठी तीन हजार एकर भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यापैकी सुमारे ५० हेक्टर जमिन ताब्यात देण्यास अद्याप संमती मिळालेली नाही. मात्र संमितीपत्र मिळालेल्या सर्व जमिनीची मोजणी झाली आहे. त्या व्यतिरिक्त २४० हेक्टर जमीन देण्याची तयारी शेतकऱ्यांनी दर्शविली आहे. त्या जमिनीची मोजणीही करण्यात येत आहे.**

# पिंपरी : आयुक्तांनंतर अतिरिक्त आयुक्तांचीही बदली



**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची बदली झाली आहे. महापालिकेतील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणली असून, त्यांची सेवा मूळ वित्त विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश नगरविकास विभागाच्या उपसचिव प्रियांका छापवाले यांनी जारी केला आहे. जांभळे-पाटील यांची शासनाने २२ सप्टेंबर २०२२ रोजी महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून दोन वर्षांसाठी नियुक्ती केली होती. त्यानंतर पाटील यांना एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. पाटील यांचा २२ सप्टेंबर २०२५ मध्ये तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला होता. महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची सात ऑक्टोबर रोजी नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी बदली झाली.

त्यानंतर अवघ्या सहा दिवसांतच म्हणजे १३ ऑक्टोबर रोजी जांभळे-पाटील यांनी महापालिकेतील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याबाबत नगरविकास विभागाला पत्र दिले होते. त्यांच्या विनंतीनुसार शासनाने जांभळे-पाटील यांची प्रतिनियुक्ती शुक्रवारी संपुष्टात आणली. मूळ वित्त विभागाकडे त्यांची सेवा वर्ग करण्यात आली आहे. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी मोनिका ठाकूर यांची २० ऑक्टोबर रोजी नियुक्ती झाली होती. महसूल व वन विभागाने याबाबतचे आदेश जारी केले होते. मात्र, नगरविकास विभागाचा आदेश नसल्याने आणि महापालिकेतील तिन्ही अतिरिक्त आयुक्तांची पदे भरलेली असल्याने ठाकूर यांना रुजू करून घेण्यास प्रशासकीय अडसर होता. आता जांभळे-पाटील यांची बदली झाल्याने महसूल विभागाच्या असलेल्या ठाकूर यांना रुजू करून घेणार की मुख्याधिकारी संवर्गातील अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती होणार, याबाबत प्रशासकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

# श्रीराम प्रॉपर्टीज लिमिटेडचा पुण्यात विस्तार

## हिंजवडीमध्ये सुमारे ७०० कोटी रुपयांच्या जीडीव्ही क्षमतेसह ७ लाख चौ. फू. विकासासाठी करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अग्रगण्य मिड-मार्केट आणि मिड-प्रीमियम केंद्रित निवासी रिअल इस्टेट डेव्हलपर श्रीराम प्रॉपर्टीज लिमिटेडने (एसपीएल) पुण्यातील हिंजवडी येथील अत्यंत मागणी असलेल्या मायक्रो मार्केटमध्ये सुमारे ७ लाख चौरस फूट प्रीमियम निवासी प्रकल्पाच्या विकासासाठी संयुक्त विकास करारावर (जेडीए) स्वाक्षरी केली आहे.

Shriram Properties — Homes that live in you

एसपीएलचा पुण्यातील हा दुसरा प्रकल्प असून भारतातील सर्वात गतिमान रिअल इस्टेट हबमध्ये विस्तार करण्याची आणि जोरदारपणे स्थिर होण्याची तिची कटिबद्धता यातून अधोरेखित झाली आहे. कंपनीने मे २०२५ मध्ये उंड्री येथे स्वतःच्या पहिल्या प्रकल्पासह पुण्याच्या बाजारपेठेत प्रवेश केला होता. त्याला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला असून लॉंचिंगच्या सहा महिन्यांतच त्याची ५५ टक्क्यांपेक्षा अधिक विक्री झाली आहे.

कंपनी आता पुण्यातील हिंजवडी येथे दुसरा प्रकल्प सुरू करत आहे. हा प्रकल्प शहरी राहणीमान आणि जीवनशैली अनुभवांची नव्याने व्याख्या करणारा हाय-राइज संमिश्र वापर विकासाच्या स्वरूपात आहे. या प्रकल्पात ६.५ लाख चौरस फूट प्रीमियम अपार्टमेंट्स असून त्याला विचारपूर्वक डिझाईन केलेल्या किरकोळ आणि व्यावसायिक जागांची जोड मिळाली आहे. हे एकूण ७ लाख चौरस फुटांपेक्षा जास्त विक्रीयोग्य क्षेत्र आहे. या प्रकल्पात सुमारे ७०० कोटी रुपयांची जीडीव्ही क्षमता आहे.

मोठी मागणी असलेल्या निवासी कॉरिडॉरमध्ये मोक्याच्या ठिकाणी असलेले हे उत्पादन व्हर्टिकल लिव्हिंगमध्ये नवीन बेंचमार्क स्थापन करण्यासाठी डिझाईन केलेले आहे. या प्रकल्पामध्ये एक स्काय क्लबहाऊस असेल, त्यातून शहराची विहंगम दृश्ये, विशेष विश्रांती सुविधा आणि रहिवाशांचा अनुभव उंचावणाऱ्या सामाजिक स्पेसेस उपलब्ध होतील. त्याचे मोक्याचे स्थान, एकात्मिक डिझाईन आणि समकालीन आर्किटेक्चर यांमुळे हिंजवडीमधील एक महत्त्वपूर्ण गंतव्यस्थान म्हणून हा प्रकल्प डोळ्यांसमोर ठेवण्यात आला आहे. ॲसेट-लाईट विकास प्रारूपाच्या माध्यमातून भौगोलिक विविधता आणि भांडवल-कार्यक्षम वाढीसाठी एसपीएलची कटिबद्धता या नवीन प्रकल्पातून बळकट झाली आहे.

पुण्यातील सर्वात मोठा आयटी आणि व्यावसायिक भाग म्हणून ओळखला जाणारा हिंजवडी शहरातील सर्वात पसंतीच्या निवासी ठिकाणांपैकी एक म्हणून उदयास आला आहे. दमदार रोजगाराचे वातावरण, उत्कृष्ट दळणवळण आणि बळकट सामाजिक संरचना यांची त्यामागे चालना आहे.

स्थिर भाडे उत्पन्न आणि हिंजवडी आयटी पार्क, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि जवळच असलेल्या प्रमुख शैक्षणिक आणि आरोग्य सेवा संस्था यांमुळे घरांची मागणी कायम राहिल्याने हे मायक्रो-मार्केट अंतिम वापरकर्ते आणि गुंतवणूकदार दोघांनाही आकर्षित करत आहे.

पुण्यातील आपल्या पहिल्या प्रकल्पाला मिळालेल्या उत्साहवर्धक प्रतिसादाने भारावून जाऊन या प्रकल्पाच्या माध्यमातून श्रीराम प्रॉपर्टीज पश्चिम विभागात आपले पोर्टफोलिओ आणखी मजबूत करत आहे. दक्षिण भारतातील मिड-मार्केट हाऊसिंग सेगमेंटमध्ये आपले नेतृत्व कायम ठेवतानाच पुण्यातील उच्च-वाढीच्या मायक्रो-मार्केटमध्ये आपला विस्तार करण्यावर कंपनीने लक्ष केंद्रित केले आहे.

> **श्रीराम प्रॉपर्टीजचे उपाध्यक्ष (बिझनेस डेव्हलपमेंट) अक्षय मुरली म्हणाले, 'पुण्यातील भरभराटीला आलेल्या आयटी आणि औद्योगिक वातावरणामुळे येथे भरपूर मागणी आहे. आमच्या दुसऱ्या प्रकल्पाचा करार करणे हा आमच्या विस्ताराच्या धोरणातील एक महत्त्वाचे पाऊल आहे. या शहराच्या दीर्घकालीन क्षमतेवरील आमचा विश्वास त्यातून प्रतिबिंबित होतो. पुण्यात आमची उपस्थिती मजबूत करताना आम्हाला आनंद होत आहे. परवडणारी, उच्च गुणवत्तेची घरे पुरविण्यावर लक्ष केंद्रित करतानाच भागीदारी आणि विकास सहयोगाच्या माध्यमातून प्रमुख निवासी बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढवण्याच्या श्रीराम प्रॉपर्टीजच्या व्यापक वाढीच्या धोरणाशी हा नवीनतम प्रकल्प सुसंगत आहे.**

# रुग्ण हक्क परिषदेकडून पूरग्रस्तांसाठी ५ लाखांचा निधी

- विकास बधे यांच्या वैयक्तिक दानातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना धनादेश सुपूर्द




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रुग्ण हक्क परिषदेच्या माध्यमातून यंदाच्या दिवाळी सणामध्ये फटाके, मिठाई, भेटवस्तू आणि अनावश्यक खर्च टाळून संपूर्ण निधी अतिवृष्टीग्रस्तांसाठी दान करण्यात आला. यात सामाजिक कार्यकर्ते विकास गंगाधर बधे यांनी स्वतःच्या पुढाकाराने आणि वैयक्तिक योगदानातून पाच लाख रुपये जमा करून हा धनादेश महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपूर्द करण्यात आला.

रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी सांगितले, "फटाके, मिठाई, भेटवस्तू आणि अनावश्यक खर्च टाळून ते पैसे पुरग्रस्तांसाठी दान करावेत, असा संकल्प आम्ही घेतला. समाजाला आपणही काहीतरी देणे लागतो, या सद्भावनेतून विकास बधे यांच्या पुढाकाराने पाच लाख रुपये जमा केले. महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेती आणि घरा-दारांचे मोठे नुकसान झाले आहे. विकास बधे यांच्याप्रमाणेच या दानातून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला हजारो हातांनी मदत करावी"

विकास गंगाधर बधे यांनी म्हटले, "मी आणि आमचे कामगार यांनी शेतकरी दुःखात असल्यामुळे दिवाळी साजरी केली नाही, पाच लाख रुपये रक्कम पूरग्रस्तांसाठी दिली. युवकांचे प्रेरणास्थान असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन हा निधी सुपूर्द करणे हा माझ्यासाठी सन्मान आहे."

देवेंद्र फडणवीस यांनी धनादेश स्वीकारताना विकास बधे यांच्या वैयक्तिक दानाचे आणि रुग्ण हक्क परिषदेच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, "विकास बधे यांसारख्या कार्यकर्त्यांनी स्वतःच्या खिशातून पाच लाख दिले, हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये लोकवर्गणीतून मिळणारा पैसा महाराष्ट्राच्या संकटकाळात पिडीत लोकांच्या उपयोगी पडत आहे."

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक आणि रुग्ण हक्क परिषदेचे समन्वयक राजाभाऊ कदम यांनी विकास बधे यांच्या या कृतीचे अभिनंदन केले. परिषदेने यापूर्वी पूर, दुष्काळ आणि कोविड काळात मदत कार्य केले. मात्र विकास बधे यांनी यावेळी वैयक्तिक पातळीवर पाच लाखांचे दान देऊन नवा आदर्श निर्माण केला आहे.